# मिरा भाईंदर महानगरपालिका
# महिला व बालकल्याण विभाग
## // प्रेसनोट//
## "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजना

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजना सुरु करण्यास महिला व बालकल्याण विकास विभागाने निर्गमित केलेल्या दि.28/06/2024 व सुधारीत दि.03/07/2024 या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगे महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ हा पात्र महिला लाभार्थ्यांपर्यत सुलभरितीने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06 मध्ये प्रभाग अधिकारी यांची समन्वय/नोडल अधिकारी म्हणून खालील प्रमाणे नेमणूक करण्यात आली असून त्यांच्या अधिपत्याखाली "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" या योजनेच्या अर्जाची नोंदणी करण्यासाठी "मदत/नोंदणी कक्ष" सुरु करण्यात आलेले आहे.

| अनु.क्र. | प्रभाग कार्यालयाचे नाव | नोडल अधिकारी | प्रभाग कार्यालय | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री.स्वप्निल सावंत | सहा.आयुक्त, | प्रभाग क्र.1 | 8422811401 |
| 2. | श्री.संजय दोंदे | सहा.आयुक्त | प्रभाग क्र.2 | 8422811309 |
| 3. | श्री.जितेंद्र कांबळे | प्र.सहा.आयुक्त | प्रभाग क्र.3 | 8433911976 |
| 4. | श्रीम.प्रियांका भोसले | सहा.आयुक्त | प्रभाग क्र.4 | 7972539718 |
| 5. | श्रीम.कविता बोरकर | सहा.आयुक्त | प्रभाग क्र.5 | 8976643989 |
| 6. | श्री.प्रभाकर म्हात्रे | प्र.सहा.आयुक्त | प्रभाग क्र.6 | 9892851180 |

सदर योजनेचा लाभ घेण्याकरिता आवश्यक असलेल्या माहितीसाठी वरील नोडल अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. सदर योजनेचे offline फॉर्म/अर्ज व Narishakti Doot App" वरुन online फॉर्म अर्ज या कक्षामार्फत स्विकारले जातील तसेच ऑनलाईन अर्ज भरणेस पात्र महिला लाभार्थ्यांना तात्काळ सहाय्य केले जाईल.

"मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेचा लाभ घेण्याकरिता महिला लाभार्थ्यांनी खालील अटीशर्तीची पुर्तता करणे आवश्यक राहिल.

सदर महिलांना सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी खालील सर्व कागदपत्रांची प्रती सादर/ Narishakti Doot App वर Upload करणे आवश्यक आहे.

पात्रता – वय वर्ष 21 ते 65 वयोगटातील पात्र महिला लाभार्थीसाठी आवश्यक असणारे कागदपत्रे खालीलप्रमाणे

1. महिलेचे आधारकार्ड
2. अधिवास प्रमाणपत्र/जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला
   (अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर महिलेचे 15 वर्षापूर्वीचे (1) रेशनकार्ड (2)मतदार ओळखपत्र(3) जन्म प्रमाणपत्र (4) शाळा सोडल्याचा दाखला)
3. उत्पन्न प्रमाणपत्र/पिवळे किंवा केशरी रेशनकार्ड
4. अर्जदाराचे हमीपत्र
5. बँक पासबुक
6. महिलेचा जन्म परराज्यातील असल्यास पतीचे अधिवास प्रमाणपत्र/15 वर्षापूर्वीचे (1) रेशनकार्ड (2)मतदार ओळखपत्र(3) जन्म प्रमाणपत्र (4) शाळा सोडल्याचा दाखला)

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामधील सर्व महिलांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा लाभ घेण्यात यावा.